# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

## मा. ह प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक - ७

(सभावृत्तांत)

दिनांक – १/०२/२०१८ वेळ. दु.१२.०० वा.

.......................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दि. १/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये" आयोजित करणेत आली होती.सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.सुजाता सुनिल पालांडे सभापती
२) मा.शाम गणपतराव लांडे
३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
४) मा.आशा धायगुडे – शेंडगे
५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे (कार्यकारी अभियंता स्था.), श्री.संजय खाबडे (कार्यकारी अभियंता वि.),श्री.शिरीष पोरेडी (उप.अभियंता स्था.), श्री.विजयसिंह भोसले (उप.अभियंता स्था.), श्री.जावळे आर.के (उप.अभियंता पा.पु), श्री.विशाल कांबळे (उप अभियंता जलनि:सारण), श्री.ज्ञानेश्वर सासवडकर (सहा.आरोग्याधिकारी), श्री.शहाजी माळी (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक), श्री.शिरसाट आर.जी. (उद्यान सहाय्यक), श्री.प्रदीप बाराथे (लेखाधिकारी), श्री. राजेश माडे (अतिक्रमण प्रमुख) श्री.हुच्चे सी.सी. (अतिक्रमण निरीक्षक), श्री.तिटकारे के.एस. (कार्यालयीन अधिक्षक), श्री.दळवी जी.आर. (सर्व्हेअर), श्री.संजय रणदिवे (सर्व्हेअर ), श्री.उध्दव डवरी (आ. नि.), श्री.महेंद्र देवरे (क.अ.), श्री.समीर दळवी (क.अ.),श्री. दांगडे एस.डी. (क.अ.), श्री.दिग्विजय पवार (क.अ.), श्रीम. वंदना मोरे (क.अ.), श्रीम.प्रिती यादव (क.अ.), श्री.संदीप लोहकरे (क.अ.),श्री.बनसोडे एस.पी. (क.अ.), श्री.सचिन सानप (क.अ.),श्रीम.जयश्री साळवे (क्रीडा पर्यवेक्षक ) इ.अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा. सभापती हे आजच्या सभेस उपस्थित नसल्याने मा.सभापती मा.सौ.सुजाता सुनिल पालांडे यांनी सभापती पदी स्थानापन्न व्हावे.

**मा.सभापती –** सर्वप्रथम मा.सभापती मा. सौ. सुजाता सुनिल पालांडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) **दि. ७/१२/२०१७ कार्यपत्रिका क्र. ५** ( दि.७/१२/२०१७ दु.१२.०० वा., दि.४/१/२०१८ दु. ११.४५ वा. व दि. ८/१/२०१८ दु. १२.०० वा.) रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) **दि.४/१/२०१८ कार्यपत्रिका क्र.६** (दि. ४/१/२०१८ दु.१२.०० वा. दि. ८/१/२०१८ दु. १२.१५ वा.) रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले --**

विषय क्र.१) प्रभाग क्र.२० एच.ए. कॉलनी, येथील अंतर्गत रस्ते व भागात ड्रेनेज लाईन करणेबाबत मा.उषा उर्फ माई ढोरे व मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र.३० मधील आई उद्यान व सितांगण उद्यान येथे ओपन जीम व नविन खेळणी बसविणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे असलेली अल्लाम्मा इक्बा उर्दु शाळेत मुख्याध्यापक नेमणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) प्रभाग क्र.३० कासारवाडी येथील प्रवेशद्वारास "गणपती विसर्जन घाट प्रवेशद्वार" हे नांव देणेस व कासारवाडी गावातील विकासासाठी योगदान केलेल्या दिवंगत सामाजिक कार्यकर्ते "कै. भिमराव महादू जवळकर" ( मा.सभापती शिक्षण मंडळ पिं.चिं.म.न.पा.) असे नांव देणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) प्रभाग क्र.३० कासारवाडी येथील उर्दु शाळेत उपलब्ध जागेत मनपाचा O.P.D. दवाखाना चालू करणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) प्रभाग क्र.३० डी.पी. मध्ये असलेला आंबेडकर पुतळा ते वि.भा.पाटील पुलापर्यंतचा ३० मीटर रोड मधल्या झोपडपट्टीतील बाधीत झोपडीधारकांचे पुर्नवसन करणेस व श्री. एस.बी.पाटील यांचेकडे सध्या मनपाचे ६०/८० सदनिका तयार आहेत तेथे झोपडीधारकांचे पुर्नवसन करणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) प्रभाग क्र.३० दापोडी येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे देखरेख करणारे सुरक्षारक्षकांना समोरील मोकळया जागेत बसणेसाठी केबीन करणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.८) प्रभाग क्र.३० मधील स्वातंत्र्यसैनिक रामभाऊ काटे पुलालगतच्या हुतात्माभाई कोतवाल चौकाचे व नामफलकाचे सुशोभिकरण करणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.९) प्रभाग क्र.३० मधील सिध्दार्थ नगर, जयभिम नगर, पवार वस्ती, गुलाब नगर, नवभारत नगर, गुरवपट्टा या ठिकाणी भूमीगत विद्युत पुरवठा करणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१०) प्रभाग क्र.३० मधील दापोडी गावात असलेला छत्रपती शिवाजी महाराज पुतळयास सी.सी.टि.व्ही.कॅमेरा बसविणेस व कासारवाडी – काव्या हॉटेल, फुगेवाडी – विठ्ठल मंदिर, दापोडी – स्वामी विवेकानंद, दापोडी – बौध्द विहार या ठिकाणी सी.सी. टि.व्ही. कॅमेरा बसविणेबाबत - मा. रोहित काटे व मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.११) प्रभाग क्र.३० मधील पवना नदी किनारी शालेय विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांचे वृक्षारोपण केलेले आहे. झाडांची उंची वाढलेली वृक्ष वड, पिंपळ, कडूनिंब, फणस, आवळा, मोसंबी, सोनचाफा, पारिजात इतर अनेक प्रजातीची एकुण ७५ वृक्ष आहेत. वृक्ष संवधनासाठी संरक्षण जाळी बसवून मिळणेबाबत - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१२) प्रभाग क्र.३० मधील सोसायटीचे नामफलक लावणेबाबत –१) ओंकारा सोसायटी २) मयुर वाटीका ३) मंत्री हौसींग सोसायटी ४) अँवलॉन सिटी ५) कल्पतरु सोसायटी ६) सरीता अपार्टमेंट ७) विकासशील सोसायटी ८) मंत्री कॉम्प्लेक्स ९) काटे रेसीडेन्सी १०) सुंदरबाग कॉलनी ११) सिद्धी टॉवर १२) आनंदवन वसाहत १३) युनियनपार्क सोसायटी असे प्रत्येक सोसायटी समोर नामफलक लावणेबाबत - मा.स्वाती (माई) काटे, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१३) प्रभाग क्र.३० मधील दापोडी सेमी गेट समोर भुयारी मार्गाचे काम सुरु आहे. तरी रोहिदास महाराज यांचा कुठल्याही प्रकारचा पुतळा नाही. तरी समाजाकडून मागणी करणेत आलेने या भुयारी मार्गाला “श्री. संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज” असे नाव देणेबाबत – मा.राजू बनसोडे, मा. स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१४) प्रभाग क्र.३२ सांगवी मधील ज्या बोअरवेल आहेत. त्या सर्व बोअरवेल (बोरींग) चालू स्थितीत करणेबाबत - मा.उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१५) प्रभाग क्र.३२ सांगवी मधील नर्मदा उद्यान समोरील एम.एस.काटे चौक सुशोभिकरण करणेत येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत - मा.उषा उर्फ माई ढोरे,मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१६) प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी मधील दशक्रिया विधी शेड अंतर्गत दुरुस्तीबाबत -- मा.उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१७) प्रभाग क्र.३२ जुनी सांगवी येथील महानगरपालिकेचे अहिल्यादेवी होळकर हे प्राथमिक विद्यालय असुन तेथील तळमजल्यावर सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी हॉल उपलब्ध आहे. या हॉलला "स्व.दशरथ शं.सोनवणे गुरुजी सभागृह" असे नाव देणेबाबत मा.उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१८) प्रभाग क्र. ३१ नवी सांगवी, पिंपळे गुरव या प्रभागातील प्रमुख रस्ते आणि प्रमुख चौकांमध्ये दररोज पार्कींग मुळे वाहतुक समस्या निर्माण होत असुन सर्वसामान्य नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याने खालील मार्गावर सम व विषम ( P1 आणि P2 ) पार्कींग करावे. तसेच प्रमुख चौक नो पार्कींग झोन जाहिर करावेत.

१) साई चौक नवी सांगवी ते जिजामाता उद्यान पर्यंत " राजश्री शाहु महाराज मार्ग"

२) रामकृष्ण मंगल कार्यालय ते मयुर नगरी पर्यंत "राजमाता जिजाऊ मार्ग"

३) एस.एम. काटे चौक ते एम.के. हॉटेल चौक पर्यंत या मार्गावर P1 आणि P2 पार्कींग करणेबाबत

४) काटे पुरम चौक, कृष्णा चौक, साई चौक, फेमस चौक आणि क्रांती चौक या सर्व प्रमुख चौकांमध्ये सर्व दिशांना १०० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन जाहिर करावे. सदर ठिकाणी त्या प्रमाणे फलक लावणेस मान्यता देणेबाबत - मा.माधवी राजापुरे, मा. सीमा चौगुले यांचा प्रस्ताव

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्र - ३६ विषय क्र - १

दि - १/२/२०१८ विभाग – महापालिका सभा

सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे अनुमोदक – मा.आशा धायगुडे - शेंडगे

संदर्भ - मा.सुजाता पालांडे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २० संत तुकाराम नगर, येथील एच.ए कंपनीतील कामगारांची वसाहत आहे. सध्यास्थितीत एच.ए. कंपनीची आर्थिक परिस्थिती खराब असल्याकारणाने एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते, पावसाळी गटर, ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे शक्य होत नाही. त्यामुळे एच.ए.कॉलनी परिसरात नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी आपण लवकरात लवकर एच.ए.कॉलनी परिसरात रस्ते सुधारणे, गटर दुरुस्ती, ड्रेनेज लाईन दुरुस्त करुन देणेकामी सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे मान्यता घेणेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ३७ विषय क्र - २
दि - १/२/२०१८ विभाग – उद्यान
सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे
संदर्भ - मा.रोहित काटे,मा.राजू बनसोडे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील “आई उद्यान” दापोडी व “सितांगण उद्यान” कासारवाडी येथे तरुणांसाठी ओपन जीम विकसीत करावी व संबंधित दोन्ही उद्यानातील खेळणी तुटलेली आहेत तसेच काही खराब झालेली आहे. त्यामुळे तेथे नविन आकर्षक खेळणी बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ३८ विषय क्र - ३
दि - १/२/२०१८ विभाग - प्रशासन
सुचक - मा. मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे
संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे असलेली अल्लाम्मा इक्बा उर्दु शाळेमध्ये गेली दोन महिने मुख्याध्यापक नाही, त्यामुळे शाळेची शिस्त बिघडत चालली आहे. लवकरात लवकर शाळेत मुख्याध्यापक नेमणुकीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ३९ विषय क्र - ४
दि - १/२/२०१८ विभाग - स्थापत्य
सुचक - मा.रोहित काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे
संदर्भ – मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० कासारवाडी येथील प्रवेशद्वारास “गणपती विसर्जन घाट प्रवेशद्वार” हे नांव देणेस व कासारवाडी गावातील विकासासाठी योगदान केलेल्या दिवंगत सामाजिक कार्यकर्ते “कै. भिमराव महादू जवळकर” ( मा.सभापती शिक्षण मंडळ पिं.चिं. म.न.पा.) असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ४० विषय क्र - ५
दि - १/२/२०१८ विभाग – वैद्यकिय
सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे
संदर्भ – मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० कासारवाडी येथील उर्दु शाळेत उपलब्ध जागेत मनपाचा O.P.D. दवाखाना चालू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ४१ विषय क्र - ६

दि. १/२/२०१८ विभाग - झोनिपू

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० डी.पी. मध्ये असलेला आंबेडकर पुतळा ते वि.भा पाटील पुलापर्यंतचा ३० मीटर रोड मधल्या झोपडपट्टीतील बाधीत झोपडीधारकांचे पुर्नवसन करणेस व श्री.एस.बी.पाटील यांचेकडे सध्या मनपाचे ६०/८० सदनिका तयार आहेत. तेथे झोपडीधारकांचे पुर्नवसन करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४२ विषय क्र - ७

दि - १/२/२०१८ विभाग – स्थापत्य

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे देखरेख करणारे व सुरक्षारक्षकांना समोरील मोकळया जागेत बसणेसाठी केबीन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४३ विषय क्र - ८

दि - १/२/२०१८ विभाग - स्थापत्य

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील स्वातंत्र्यसैनिक रामभाऊ काटे पुलालगत स्वातंत्र्यसुर्य हुतात्माभाई कोतवाल चौक नामकरण पालिकेने यापूर्वी केलेले असून सदर नामकरणाचा नामफलक सिंग्नलच्या चौकात मध्यभागी घेऊन बसविणेस व योग्य त्या पध्दतीने सुशोभिकरण मशालीचे म्युरलस उपलब्ध जागेत करावे. वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घेवून सदर जागेत उपलब्धतेप्रमाणे चौथरा उभारुन त्यावर मशाल त्याखाली शक्य असेल तर हात तीन लोकांचे असावेत. असे ठरावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४४ विषय क्र - ९

दि - १/२/२०१८ विभाग – विद्युत

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील सिध्दार्थ नगर, जयभिम नगर, पवार वस्ती, गुलाब नगर, नवभारत नगर, गुरवपट्टा या ठिकाणी घरगुती विद्युत पुरवठा हा विद्युत तारेच्या साहाय्याने घरावरुन केला जातो या विद्युत तारेमुळे या वरील विभागात नागरिकांना विद्युत वाहक तारेचा मोठया प्रमाणात धोका आहे. त्यामुळे मागील काळात दोन नागरिकांना त्यांचा जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे पुढील काळात अशी दुर्घटना टाळण्यासाठी वरील ठिकाणी भूमीगत विद्युत पुरवठा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४५ विषय क्र - १०

दि - १/२/२०१८ विभाग – विद्युत

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील दापोडी गावात असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाची देखरेख होऊ शकेल असा सी.सी.टि.व्ही. कॅमेरा तेथे नाही, सध्या जे सी.सी.टि.व्ही. कॅमेरे आहेत त्यांच्या दिशेने आजुबाजुचा परिसर दिसतो, पण छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा दिसत नाही. म्हणुन सी.सी.टि.व्ही. कॅमेरा बसविण्याची ठिकाणे - कासारवाडी – काव्या हॉटेल, फुगेवाडी – विठ्ठल मंदिर, दापोडी – स्वामी विवेकानंद, दापोडी – बौध्द विहार या ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४६ विषय क्र - ११

दि - १/२/२०१८ विभाग – उद्यान

सुचक - मा. रोहित काटे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा.राजू बनसोडे दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील पवना नदी किनारी शालेय विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांचे वृक्षारोपण केलेले आहे. झाडांची उंची वाढलेली वृक्ष वड, पिंपळ, कडुनिंब, फणस, आवळा, मोसंबी, सोनचाफा, पारिजात, इतर अनेक प्रजातींची एकुण ७५ वृक्ष आहेत. वृक्ष संवर्धनासाठी संरक्षण जाळी बसवून मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४७ विषय क्र - १२
दि - १/२/२०१८ विभाग – स्थापत्य
सुचक - मा.स्वाती (माई) काटे अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ:- मा.स्वाती (माई) काटे, मा.राजू बनसोडे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील सोसायटीचे नामफलक लावणेबाबत – १) ओंकारा सोसायटी २) मयुर वाटीका ३) मंत्री हौसींग सोसायटी ४) अँवलॉन सिटी ५) कल्पतरु सोसायटी ६) सरीता अपार्टमेंट ७) विकासशील सोसायटी ८) मंत्री कॉम्प्लेक्स ९) काटे रेसीडेन्सी १०) सुंदरबाग कॉलनी ११) सिद्धी टॉवर १२) आनंदवन वसाहत १३) युनियनपार्क सोसायटी असे प्रत्येक सोसायटी समोर नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४८ विषय क्र - १३
दि - १/२/२०१८ विभाग – स्थापत्य
सुचक - मा.राजू बनसोडे अनुमोदक – मा. स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. राजू बनसोडे, मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील दापोडी सेमी गेट समोर भुयारी मार्गाचे काम सुरु आहे. तरी रोहिदास महाराज यांचा कुठल्याही प्रकारचा पुतळा नाही. तरी समाजाकडून मागणी करणेत आलेने या भुयारी मार्गाला “श्री. संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज” असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ४९ विषय क्र - १४
दि - १/२/२०१८ विभाग - पाणीपुरवठा
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे अनुमोदक - मा. आशा धायगुडे - शेंडगे

संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३२ सांगवी मधील ज्या बोअरवेल आहेत. त्या सर्व बोअरवेल (बोरींग) चालू स्थितीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ५०
विषय क्र - १५
दि - १/२/२०१८
विभाग –उद्यान
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे
अनुमोदक - मा. आशा धायगुडे - शेंडगे
संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे, यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३२ सांगवी मधील नर्मदा उद्यान समोरील एम.एस.काटे चौक सुशोभिकरण करणेत येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ५१
विषय क्र - १६
दि - १/२/२०१८
विभाग – स्थापत्य
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे
अनुमोदक - मा. आशा धायगुडे - शेंडगे
संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

वॉर्ड क्र.३२ मधील जुनी सांगवी सर्व्हे न.९ पवना नदी किनारी दशक्रिया शेड आहे ते शेड १५ वर्षापूर्वी झालेले आहे. तरी ते शेड मध्ये दशक्रिया विधी करणेचा भाग खूपच खाली खचलेला असल्याने जमिनीची उंची वाढवून तसेच शेजारी जुनी सांगवी, नवी सांगवी मधील संपूर्ण कचरा रोडच्या शेजारी जमा होत असून त्याची अतिशय दुर्गंधी दशक्रिया विधी करणेच्या ठिकाणी येत असते, त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येण्याचा संभव आहे, तरी दशक्रिया विधी शेड मधील जमिनीची उंची वाढविण्याच्या कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ५२
विषय क्र - १७
दि - १/२/२०१८
विभाग - स्थापत्य
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे
अनुमोदक - मा. आशा धायगुडे - शेंडगे
संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी येथील महानगरपालिकेचे अहिल्यादेवी होळकर हे प्राथमिक विद्यालय असुन तेथील तळमजल्यावर सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी हॉल उपलब्ध आहे. या हॉलला "स्व.दशरथ शं.सोनवणे गुरुजी सभागृह" असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ५३

दि - १/२/२०१८

सुचक - मा.माधवी राजापुरे

विषय क्र -१८

विभाग – स्थापत्य

अनुमोदक - मा. सीमा चौगुले

संदर्भ:- मा.माधवी राजापुरे, मा. सीमा चौगुले यांचा दि. १/२/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. ३१ नवी सांगवी व पिंपळे गुरव या प्रभागातील प्रमुख रस्ते आणि प्रमुख चौकांमध्ये दररोज पार्कींग मुळे वाहतुक समस्या निर्माण होत असुन सर्वसामान्य नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याने खालील मार्गावर सम व विषम ( P1 आणि P2 ) पार्कींग करावे. तसेच प्रमुख चौक नो पार्कींग झोन जाहिर करावेत. १) साई चौक नवी सांगवी ते जिजामाता उद्यान पर्यंत " राजश्री शाहु महाराज मार्ग" २) रामकृष्ण मंगल कार्यालय ते मयुर नगरी पर्यंत "राजमाता जिजाऊ मार्ग" ३) एस.एम. काटे चौक ते एम.के. हॉटेल चौक पर्यंत या मार्गावर P1 आणि P2 पार्कींग करणेस मान्यता मिळणेस ४) काटे पुरम चौक, कृष्णा चौक, साई चौक, फेमस चौक आणि क्रांती चौक या सर्व प्रमुख चौकांमध्ये सर्व दिशांना १०० मीटर पर्यंत नो पार्कींग झोन जाहिर करावे, सदर ठिकाणी त्या प्रमाणे फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

( मा.सुजाता सुनिल पालांडे )

सभापती, ह प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे /१०/ कावि / १६ / २०१८

दिनांक - १५ / ०२ / २०१८

प्रशासन अधिकारी

तथा

सचिव (सभाशाखा)

ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर